साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१६ | पाने-१२ | दि.२६/०४/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# हुकूमशाही संपविण्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांना मतदान करा : शरद पवार

करमाळा : सध्या देशामध्ये हुकूमशाहीचे राज्य चालू आहे. ही हुकूमशाही संपविण्यासाठी व देशात परिवर्तन आणण्यासाठी आपण सर्वांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या तुतारीला मतदान करून विजयी करावे; असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारचे अध्यक्ष दस्तुरखुद्द शरद पवार यांनी केले.

माढा मतदार संघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांची प्रचारसभा व माजी आमदार नारायण पाटील यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश कार्यक्रमात श्री.पवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आमदार रोहित पवार, माजी आमदार नारायण पाटील, अहिल्यादेवीचे वंशज भूषणसिंह होळकर, माळशिरसचे उत्तमराव जानकर, अभयसिंह जगताप, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष वारे, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील, पंचायत समितीचे माजी



सभापती अतुल पाटील, मकाईचे माजी अध्यक्ष आप्पासाहेब झांजुर्णे, माजी उपाध्यक्ष शहाजी देशमुख, सुभाष गुळवे,चिखलठाणचे सरपंच विकास गलांडे, बहुजन संघर्ष सेनेचे राजाभाऊ कदम, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, मुस्लिम संघटनेचे अध्यक्ष उस्मानशेठ तांबोळी, अल्ताफशेठ तांबोळी, युवकचे शहराध्यक्ष अमीर तांबोळी, शिवसेना तालुका प्रमुख सुधाकर लावंड, प्रविण कटारिया, **(पान २ वर)**

## करमाळ्याचं डॅमेज पवारांनी केले दुरुस्त

महायुतीने सर्वात आधी उमेदवार जाहीर केल्याने भाजपा उमेदवाराने जोरदार प्रचार केला होता. अर्थातच करमाळ्यातील आ.संजयमामा शिंदे, मा.आ.जयवंतराव जगताप, मा.आ.नारायण पाटील आणि बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल तसेच दिग्विजय बागल हे सर्व महायुतीच्या बाजुला होते. पवार यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांना उमेदवारी दिली आणि आजच्या दौऱ्यात मा.आ.नारायण पाटील यांचा जाहीर प्रवेश मिळवला तर मा.आ.जयवंतराव जगताप यांची भेट घेऊन जगताप गटाच्या शुभेच्छा मिळवल्या आहेत. याबरोबरच बागल समर्थक अन्य कार्यकर्त्यांना सांगावा धाडून करमाळ्याचं डॅमेज पवारांनी दुरूस्त केलं आहे.



राजकारणात कधी घडेल आणि कधी बिघडेल हे सांगता येत नाही !

**संपादकीय..........................................!**

# एकतर्फी निवडणूक झाली जड !

माढा लोकसभा मतदार संघ हा हक्काचा व खात्रीचा समजून भाजपाने अंतर्गत विरोध असूनही विद्यमान खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना उमेदवारी दिली. ज्यावेळी भाजपाने राज्यातील २२ उमेदवारांची यादी जाहीर केली, या पहिल्या यादीतच माढ्याची उमेदवारी जाहीर केली. त्यावेळी माढा मतदार संघ हा भाजपाचा एकतर्फी विजय देणारा मतदार संघ म्हणून ओळखले जात होते. भाजपाने पहिल्या यादीत माढ्याचे नाव जाहीर केले आणि तिथंच भाजपाचं गणित चुकलं. अंतर्गत विरोधकांना विचारविनियम करण्यासाठी खूप वेळ मिळाला आणि त्याचा फायदा अस्सल विरोधकांनी उठवला. यामुळे माढ्याची एकतर्फा असलेली निवडणूक सध्या भाजपाला जड जात असल्याचे दिसून येत आहे.

माढा लोकसभा निवडणुकीत ४२ उमेदवारांनी ५५ नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती. २० एप्रिलला नामनिर्देशन पत्राची छाननी होऊन ३८ उमेदवारांचे ४७ नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी ६ जणांनी माघार घेतली आणि निवडणूक रिंगणात ३२ उमेदवार राहिलेले आहेत. यामध्ये खरी लढत भाजपाचे रणजितसिंह नाईकनिंबाळकर, महाविकास आघाडीचे धैर्यशील मोहिते-पाटील, वंचित बहुजन आघाडीचे रमेश बारसकर यांच्यात होत आहे.

माढा लोकसभा मतदार संघात करमाळा, माढा, माळशिरस, सातारा जिल्ह्यातील फलटण, माण-खटाव ही विधानसभा मतदार संघ येतात. यामध्ये मतदारांची एकूण संख्या १९ लाख ९६ हजार १०० इतकी आहे. यापैकी पुरूष मतदार १० लाख ३५ हजार ६७८ असून महिला मतदार ९ लाख ५५ हजार ७०६ आहेत व इतर ७० मतदार आहेत. या मतदार संघातील विधानसभा मतदार संघाचा आढावा घेतला असता, भाजपाची ताकद मोठी दिसते. करमाळा आमदार संजयमामा शिंदे, माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे हे अजित पवार राष्ट्रवादीचे आहेत. सांगोलाचे आमदार शहाजीबापू पाटील (एकनाथ शिंदे शिवसेना), माळशिरसचे आमदार राम सातपुते (भाजपा), फलटणचे आमदार दिपक चव्हाण (राष्ट्रवादी अजित पवार), माणचे आमदार जयकुमार गोरे (भाजपा) हे सर्वच्या सर्व भाजपा सोबत आहेत. तरीही भाजपा उमेदवार अडचणीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. याचे कारण मागील निवडणूकीत रणजितसिंह नाईकनिंबाळकर हे ८५ हजार ७६४ मतांनी विजयी झाले होते. त्यावेळी एकट्या माळशिरसने त्यांना १ लाख ४ हजाराचे लिड दिले होते व त्याच मताच्या जोरावर ते विजयी झाले होते. ज्या माळशिरसने त्यांना लिड दिले तोच माळशिरस तालुका यावेळी त्यांच्या विरूध्द एकसंघपणे उभा ठाकला आहे. विशेष म्हणजे माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटील विरोधक म्हणून ओळखले जाणारे धनगर समाजाचे नेते उत्तमराव जानकर यांना फडणवीस यांनी थेट विमानाने नागपूरला बोलावले होते, परंतु नागपूर वारी केल्यानंतरही त्यांनी परंपरागत विरोधक असणाऱ्या मोहिते-पाटील यांनाच पाठबळ देण्याचे जाहीर केले असून त्यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांचा प्रचार सुरू केला आहे. माढा तालुक्यातील २०१९ चे विधानसभेचे शिवसेनेचे उमेदवार संजय कोकाटे यांनी एकनाथ शिंदे शिवसेनेची साथ सोडून मोहिते-पाटील यांचे बरोबर राहण्याचे जाहीर केले आहे. करमाळा तालुक्यातील माजी आमदार नारायण आबा पाटील यांनीही मोहिते-पाटील यांचा प्रचार सुरू केला आहे. फलटण तालुक्यातील रामराजे निंबाळकर यांचे बंधू रघुनाथराजे निंबाळकर व त्यांच्या भगिणी श्रीमंत सुभद्राराजे नाईकनिंबाळकर यांनी आजी-माजी ४० नगरसेवकांसह धैर्यशील मोहिते-पाटील यांना पाठींबा दिला आहे. माणचे आमदार जयकुमार गोरे यांचे बंधू शेखर गोरे हे मोहिते-पाटील यांचे बरोबर आहेत. सांगोला येथील शहाजीबापू हे विजयी होतानाच अतिशय नगण्य मताने विजयी झाले आहेत. त्यांच्या पक्षांतरामुळे शिवसेनेतील एक गट ठाकरे यांचे सोबत आहे. तसेच कै.गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ.अनिकेत देशमुख यांनीही मोहिते-पाटील यांचे सोबत काम सुरू केले आहे. तसेच राष्ट्रवादीचे अभयसिंह जगताप यांनी मन मोठे करून उमेदवारी मागे घेतली व मोहिते-पाटील यांचा प्रचार करण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे भाजपा उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना शिंदे बंधू यांच्याशिवाय भक्कम पाठबळ राहिलेले नाही.

माढा तालुक्यातील आमदार बबनदादा शिंदे व करमाळा तालुक्यातील आमदार संजयमामा शिंदे या दोघांनी भाजपा उमेदवार नाईकनिंबाळकर यांना पाठबळ दिले आहे. त्याबरोबरच माजी आमदार जयवंतराव जगताप, त्याप्रमाणेच शंभुराजे जगताप तसेच माजी आमदार शामलताई बागल, रश्मी बागल व दिग्विजय बागल यांचाही भाजपा उमेदवारास पाठींबा आहे.

वास्तविक पाहता आमदार शिंदे बंधूचे पाठबळ असलेतरी या दोघांचे समर्थक असलेले मतदार सन २०१९ च्या निवडणुकीत संजयमामा शिंदे यांना याच नाईकनिंबाळकरांनी पराभूत केल्याचा रोष मनात ठेवून असल्याने ते खा.निंबाळकरांसोबत जाणार की नाही ? हाही महत्वाचा प्रश्न आहे. तर माजी आमदार जगताप यांचे व मोहिते-पाटलांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. नुकतीच झालेली बाजार समितीची बिनविरोध निवडणूक ही मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखालीच झालेली आहे, ही बाब मतदारांना माहित आहे. त्यामुळे श्री.जगताप भाजपा मध्ये असलेतरी जगताप समर्थक हे भाजपासाठी काम करतील, असे चित्र नाही. हीच बाब बागल समर्थकातही आहे. कारण बागल आणि मोहिते-पाटील यांचेही जिव्हाळ्याचे संबंध आहेत आणि दस्तुरखुद्द मोहिते-पाटील परिवाराचा प्रतिनिधी उभे असल्याने वरून भाजपा आतून तुतारी अशीच वाटचाल होऊ शकते. माजी आमदार पाटील हे उघडपणेच मोहितेंचा प्रचार करत असल्याने व मोहिते समर्थक केमचे माजी सरपंच अजित तळेकर, जि.प.चे माजी अध्यक्ष अनिरूध्द कांबळे, सवितादेवी राजेभोसले, प्रा.शहाजीराव देशमुख, अमरजित साळुंके, बंडू माने, हरिभाऊ मंगवडे, महेंद्र पाटील आदी समर्थक कामाला लागले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत मुळ भारतीय जनता पार्टीचे असणारे गणेश चिवटे, दिपक चव्हाण, जगदीश आगरवाल, विठ्ठलराव भणगे, नरेंद्रसिंह ठाकूर, रामा ढाणे, किरण बोकन, शाम सिंधी, महेश परदेशी आदी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे व त्यांचे सहकारी फक्त ताकदीने काम करू शकतात.

करमाळा तालुक्याचा विचार केला असता सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपा उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकरांना ५४,७४२ तर संजयमामा शिंदे ६५,१३२ मते मिळाली होती. त्यामध्ये भाजपा विरोधकास १० , ३९० मताधिक्य मिळाले होते. तर करमाळा मतदार संघात नाईकनिंबाळकर यांना ७१,५०३ मते तर संजयमामा यांना १,०१,९३२ म्हणजे राष्ट्रवादीला ३०,४२९ मताधिक्य मिळाले होते. अर्थातच यात ३६ गावाचा मोठा हिस्सा होता आणि यावेळी ती सर्व गावे नाईकनिंबाळकर यांचे सोबत असणार आहेत. गेल्या निवडणुकीत बागल गट व संजयमामा शिंदे हे एकत्र होते. ही बाब यावेळी तशीच आहे. पण बागल गटाने ऊस उत्पादकांचे आडविलेल्या पैशामुळे मतदार त्यांच्या सोबत जातीलच असे नाही. अर्थातच या निवडणुकीची पार्श्वभुमी वेगळी आहे.

राज्यात झालेले सत्तांतर विशेषत: भाजपाने शिवसेना व राष्ट्रवादीतील आमदारांना घेऊन बनवलेले शासन आणि त्याबाबत केलेल्या तडजोडी या निश्चितच सर्वसामान्य नागरीकांना पटलेल्या नाहीत. शासनाने घेतलेले निर्णय हे शेतकऱ्यांच्या विरूध्द असल्याचे मत सर्वसामान्य शेतकऱ्यांचे आहे. दुसरी बाब म्हणजे अजित पवारांना भाजपाने सामावून घेतल्याने शरद पवार यांना मिळत असलेली सहानुभूती ही बाबही या मतदार संघात महत्वाची ठरणार आहे. करमाळा तालुक्यात भाजपाच्या यादीवर अनेक मोठे नेते असलेतरी या निवडणुकीला या नेत्यांचा फारसा उपयोग होणार नाही असेच चित्र दिसत आहे. मोहिते-पाटलांनी उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण तालुक्यात फिरून मतदारांचा घेतलेला होकार आणि मतदारांची सरकारवर असलेली नाराजी त्यामुळे माढा लोकसभा मतदार संघातील एकतर्फी वाटणारी निवडणूक आता भाजपाला जड जात आहे हे स्पष्ट झाले आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे..

# हुकूमशाही संपविण्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांना मतदान करा : शरद पवार



आदिनाथचे माजी संचालक नवनाथ झोळ, धुळा कोकरे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष शिवराज जगताप, राष्ट्रवादीचे शहर खजिनदार अरूण टांगडे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप, उदयसिंह मोरे-पाटील, सवितादेवी राजेभोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, की लोकसभा निवडणुकीनंतर विशेष बैठक घेऊन रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू; असे आश्वासन दिले. पुढे श्री.पवार म्हणाले, की शेतीमालाच्या किंमती हा महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. उत्पादन खर्चाचा विचार करून शेतकऱ्यांना शेतमालाला भाव मिळाला पाहिजे तो निर्णय घेतला पाहिजे. पण तो आज घेतला जात नाही. आजच्या पंतप्रधानांना या सर्व गोष्टींची आस्था नाही. एखाद्या हुकूमशाहीचे राज्य असावे असे ते राज्य करतात. सध्या जे राजकीय लोक मोदींवर टिका करतात **(पान ३)**ते त्यांना तुरूंगात टाकत आहेत. अशा पध्दतीने देशाचा कारभार चालू असून हुकूमशाही संपविण्यासाठी देशात परिवर्तनाची गरज आहे. म्हणून माढा मतदार संघातून धैर्यशील मोहिते-पाटील यांना आपण जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून द्यावे.

यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केलेले माजी आमदार नारायण पाटील यांनी रिटेवाडीसह तालुक्यातील वीज, उजनी पाण्याची समस्या, रेल्वे इ. विविध समस्या मांडून त्या सोडविण्यासाठी श्री.पवार यांचेकडे मागणी केली.आदिनाथ कारखान्यासाठी शरद पवार व विजयसिंह मोहिते-पाटील यांनी मदत केली होती. त्यामुळे हा कारखाना पुन्हा चांगला चालण्यासाठी तालुका आशेने तुमच्याकडे पाहत आहे. भविष्यात तालुक्यात राष्ट्रवादी पक्ष व पक्षाचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून तालुक्याचा विकास करण्यासाठी रात्रंदिवस काम करू.

यावेळी आमदार रोहित पवार म्हणाले, की आदिनाथ कारखान्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे शेतकरी हितासाठी प्रयत्न केले. परंतु यामध्ये तानाजी सावंत यांनी आडकाठी आणून आज या आदिनाथ कारखान्याची काय अवस्था करून ठेवली हे शेतकरी पाहत आहेत. नारायण पाटील यांचा कारखाना चालू व्हावा हा चांगला हेतू होता. परंतु चुकीच्या माणसाच्या नादी लागल्याने आदिनाथ चालू होवू शकला नाही. नारायण आबा यांचे पैलवानकीमध्ये मोठे नाव होते. ते आज खंबीरपणे पवार साहेबांबरोबर आहेत. मी आबांना एवढंच सांगेन तुम्ही आता योग्य तालीमत आहात. तुमचे वस्ताद पवार साहेब हे मोठे वस्ताद असून, ५० वर्षे या वस्तादाने भाजपाच्या विरोधात लढा दिला आहे. कितीही मोठी ताकद या वस्तादासमोर कमी पडलेली आहे. साहेबांनी

## पवार यांचेकडून जुन्या आठवणींना उजाळा

करमाळा तालुका हा तसा दुष्काळी तालुका होता. १९७२ साली ज्यावेळी दुष्काळ पडला होता त्यावेळी मी या जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. त्यामुळे करमाळ्याला माझे सारखे येणे-जाणे होते. स्व.नामदेवराव जगताप व स्व.शंकरराव मोहिते-पाटील, स्व.विठ्ठलराव शिंदे, स्व.औदुंबर पाटील या लोकांनी जिल्ह्याच्या विकासासाठी व दुष्काळावर मात करण्यासाठी काम केले. स्व.नामदेवराव जगताप यांचा याच मार्केट कमिटीत छोटासा बंगला होता. तेथूनच त्यांचा कारभार चालत असे; अशीही आठवण शरद पवार यांनी सांगितली.

अनेक पैलवान राजकीय दृष्टीकोनातून तयार केले. त्यातल्याच काही पैलवांना असे वाटले की, आता वस्तादाबरोबर आपण कुस्ती करूया. त्या पैलवानास मला सांगायचे.. साहेबांसारखा वस्ताद सोपा नसतो तो शेवटचा डाव राखून ठेवत असतो. असे सांगून ज्यांनी पक्षाशी व साहेबांशी गद्दारी केली अशा गद्दारांना या राजकीय कुस्तीत चितपट केल्याशिवाय रहायचे नाही; असा इशारा आमदार पवार यांनी दिला आहे.

यावेळी उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, की.. २१ मार्चला भाजपाने उमेदवारी नाकारली त्यावेळी लोकांनीच दादांना फोन करून काही झालेतरी निवडणूक लढवायची; असे सांगितले. त्यानंतर मी अनेक गावात दौरा केला त्या ठिकाणीही जुन्या मंडळींनी आठवणी सांगून व युवकांनीही अधिकारवाणीने काहीही झालेतरी निवडणूक लढवा अन्यथा पुन्हा तुम्ही आमच्याकडे यायचे नाही; असे हक्कांनी सांगत होते. त्यावेळेस ही निवडणूक आपल्या कुटूंबासाठी नाहीतर जनतेच्या हितासाठी व स्वाभिमानासाठी लढायची व त्यासाठी कोणतीही किंमत मोजावी लागलीतरी चालेल; असा निर्णय घेतला. या देशात समतेचे व पुरोगामी विचाराचे काम करणारी एकच व्यक्ती पवार साहेब आहेत म्हणून राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला. या राज्यात घराच्या मालकालाच तुझं घर नाही असं म्हणणारी माणसं निर्माण झाली आहेत. त्यामुळे साहेबांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहायचे आहे. यावेळी रिटेवाडी उपसासिंचन योजना तसेच मांगी तलावात कुकडीचे पाणी सोडणे, एमआयडीसीचा प्रश्न आदी समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू; असेही आश्वासन मोहिते-पाटील यांनी दिले.

यावेळी शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे वैभवराजे जगताप, शाहूदादा फरतडे, माळशिरस चे उत्तमराव जानकर, भूषणसिंह होळकर, ॲड.सविता शिंदे यांची भाषणे झाली. यावेळी नारायण पाटील गटाचे आजी-माजी जि.प.सदस्य पं.स.सदस्य, सरपंच, ग्रा.पं.सदस्य, सोसायटीचे चेअरमन यांनी तसेच बळीराजा शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गणेश मंगवडे यांनी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला. सुत्रसंचालन नितीन चोपडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिवराज जगताप यांनी मानले. या सभेला नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.





प्रचार सभेपूर्वी माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार व विजयसिंह मोहिते-पाटील यांनी माजी आमदार जयवंतराव जगताप यांची भेट घेतली. त्यावेळी स्वागत माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले. त्यांच्या या भेटीने तालुक्यात उलट-सुलट चर्चेला उधाण आले आहे.

# धैर्यशील मोहिते-पाटील यांचा प्रचारार्थ करमाळा तालुका दौरा





करमाळा(सं.प्र.) : माढा लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या निवडणुक प्रचारार्थ कार्यकर्त्यांसह करमाळा तालुका दौरा पार पडला. या दौऱ्यात उमरड, वाशिंबे, सोगाव पश्चिम येथे कार्नर बैठक तसेच मांजरगाव, पोफळज, कुंभेज, कोंढेज, साडे, वांगी, चिखलठाण येथे सभा संपन्न झाल्या. यावेळी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या बरोबर माजी आमदार नारायण पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्या सवितादेवी राजेभोसले, देवानंद बागल, भरत शिंदे, अतुल पाटील, ॲड.सविता शिंदे, अमरजित साळुंखे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.




डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
थंडा.. थंडा.. कुल.. कुल..
विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे

## उन्हाळी पदार्थ

गुलकंद । सब्जा बी। फुलराणी खडीसाखर । रोझवॉटर । गुलाब पाकळी । आईस्क्रीम पावडर फालुदा । ताक मसाला । जलजिरा पावडर । लेमन गोळी । कोकम सरबत । कोकम आगळ कैरी पन्हे । आवळा सरबत । रसना । ग्लुकोंडी । आमपन्ना पावडर । लिंबूपानी सरबत पावडर कोकनट वॉटर पावडर । आवळा कॅन्डी । मधातील आवळा कॅन्डी । मोर आवळा । रूहाब्जा

**मॅप्रो सरबत/क्रश सर्व फ्लेवर (रोझ, मँगो, पायनापल, ऑरेंज, स्ट्रॉबेरी, खस, कोकम)**

**लेमन गोळी व इतर फ्लेवर गोळ्या :** लेमन गोळी । ऑरेंज संत्री गोळी । पेपर मिंट गोळी पोलो गोळी । मँगो गोळी । कच्ची कैरी गोळी। पेरू गोळी । पान गोळी । काला खट्टा गोळी चिंच गोळी । मिक्स फ्रूट गोळी । कोको बटर गोळी (जुनी रावळगाव गोळी)

**नाचणीचे पदार्थ..**
- नाचणी
- नाचणी पीठ
- नाचणीचे पापड
- नाचणी बॉबी
- नाचणी डिस्को पापड
- नाचणी बिस्किट

| वस्तू | एमआरपी | डि.ऑफर |
|---|---|---|
| मॅप्रो क्रश/सरबत | रू.१८० | रू.१४४ |
| टाटा गोल्ड चहा १ कि. | रू.४७५ | रू.३९९ |
| **प्लास्टीक पाणी बॉटल** (अनब्रेकेबल) | **रू.११५** | **रू.४९** |

सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी ऑफर्स *
ऑफर कालावधी : १ ते १५ एप्रिल २०२४

**पापड, सांडगे व लोणचेसाठी**
- मुगदाळ
- उडीददाळ
- मटकीदाळ
- पापड मसाला
- पापड आटा
- पापड खार
- मोहरीदाळ
- लोणचे मसाला
- मेथी
- कारळं

सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या छापील किंमतीवर कमीत कमी 10% डिस्काउंट

टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
## एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

## नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी
# नाईकनिंबाळकर यांना संसदेत पाठवा : जयवंतराव जगताप



करमाळा(सं.प्र.): नरेंद्र मोदी हे देशाचे कणखर नेतृत्व असून या धाडसी नेतृत्वामुळे संपूर्ण जगात भारत देशाची प्रतिमा उंचावली असून देशाच्या सीमा सुरक्षित आहेत. मोदी हे देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होणे काळाची गरज असून त्यासाठी माढा लोकसभा मतदारसंघातून खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना संसदेत पाठविणे गरजेचे आहे; असे आवाहन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले.

विकी मंगल कार्यालयात आयोजित महायुतीच्या मेळाव्यात श्री.जगताप बोलत होते. व्यासपीठावर आमदार संजयमामा शिंदे, भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष भरत आवताडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, तालुका अध्यक्ष रामा ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, दिपक चव्हाण, किरण बोकन, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, शहरप्रमुख संजय शिलवंत, युवा सेना तालुकाप्रमुख नवनाथ गुंड, युवा सेनेचे निखिल चांदगुडे, महिला आघाडी अध्यक्षा प्रियंका गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना श्री.जगताप म्हणाले, की नाईकनिंबाळकर यांनी त्यांच्या खासदारकीच्या पाच वर्षाच्या काळात अनेक विकासाची कामे केली असून आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करमाळ्यातील प्रलंबित कामे सुरू आहेत. कुठल्याही भावनेचे राजकारण न करता देशाचे हित डोळ्यापुढे ठेवून लोकसभेच्या निवडणुकीला आपण सामोरे गेले पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या दृष्टीने आगामी काळात हिंदुस्थान जगातील एक नंबर देश होणार आहे. यासाठी नाईकनिंबाळकर यांना पुन्हा संसदेत पाठवा; असे आवाहन केले.


## डॉ.जांभळे इमर्जींग सेंटर अँन्ड पॅथॉलॉजी लॅब
बसस्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक्सच्या वर, पहिला मजला, करमाळा.

**पाहिजेत**

१. पार्टटाईम/फुलटाईम लॅब टेक्नीशियन (D.M.L.T.)
२. नाईट ड्युटी (D.M.L.T. अनुभवी,लॅब टेक्नीशियन)

तरी इच्छुक मुले/मुली यांनी पगाराचे अपेक्षेसह त्वरीत वरील पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क करावा !

**संपर्क : मो.9021909262**


# बिडवे बंधू तर्फे फिरस्त्या जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय




करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील रहिवाशी व पुणे रोडला डॉ.पवार हॉस्पिटल शेजारी असलेल्या विशाल टेलर या कपडे शिलाई व दुकानाचे मालक हेमंत बिडवे व निलेश बिडवे या दोघा बंधूनी आपल्या दुकानासमोर फिरस्त्या जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करून सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा कायम ठेवली आहे. बिडवे बंधू प्राण्यांच्या सेवेसाठी सतत आग्रही असतात. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे. सध्या तीव्र पाणी टंचाई असून, मुक्या प्राण्यांना पिण्याचे पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. तरी मुक्या प्राण्यांना पिण्याचे पाणी मिळण्यासाठी असे उपक्रम सामाजिक संघटनांनी राबवावेत; असे आवाहन बिडवे बंधूंनी केले आहे.

# मांगी जि.प.शाळेत शाळापूर्वतयारी मेळावा संपन्न



करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांगी येथे गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ, विस्तार अधिकारी सुग्रीव नीळ यांचे मार्गदर्शनाखाली शाळा पूर्व तयारी मेळावा मांगी येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.प्रकाश काळे हे होते. यावेळी उमेश बागल, प्रकाश ननवरे, गुलाब क्षीरसागर, अमोल गायकवाड, निर्मला बागल, उपसरपंच नवनाथ बागल, उपाध्यक्ष कल्पना राऊत, विक्रमा बनसोहे, सोनाली संचेती, मुख्याध्यापक संतोष पोतदार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना फेटा बांधून फुगे देवून स्वागत मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. विषय शिक्षक आदलिंग यांचे मार्गदर्शनाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या नोंदी घेण्यात आल्या. यावेळी हिरामण कौले, वैशाली पवार, सुवर्णा महामुनी, आशा देमुंडे, शोभा मारवाडी, वैशाली बागल, अनिता अवचर, रेश्मा पठाण आदी शिक्षक उपस्थित होते.

# वडगाव उत्तर येथे शाळा पूर्व तयारी मेळावा संपन्न



करमाळा(सं.प्र.): जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव उत्तर येथे शाळा पूर्व तयारी मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याची सुरूवात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रोहिणी रोडगे यांचे हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली. सर्वप्रथम पहिलीत दाखल होणाऱ्या मुलाचे औक्षण करण्यात आले. त्यानंतर मुलांना फेटे घालून व कॅटबरी चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पहिलीत दाखल सर्व मुलांच्या माता गावातील महिला मोठ्या संख्येने हजर होत्या. या कार्यक्रमास जातेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ यांनी भेट दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# किल्लावेस येथील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव साजरा

करमाळा(सं.प्र) : किल्लावेस येथील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे विश्वस्त सचिन वैकर यांचे हस्ते पवन अभिषेक करण्यात आला. त्यानंतर आरती होऊन हनुमानाच्या मुर्तीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. उत्सव समितीच्या वतीने भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला. हनुमानाच्या दर्शनासाठी करमाळा शहरातील भाविकांनी सायंकाळ पर्यंत मोठी गर्दी केली होती.





## प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकाशची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619



## पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement

- बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
- प्लंबींग
- हार्डवेअर

होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# माढा लोकसभा निवडणुकीत
# ६ जणांची माघार ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात





करमाळा(सं.प्र.) : माढा लोकसभा निवडणुकीत ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून खरी लढत भाजपाचे रणजितसिंह नाईकनिंबाळकर, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे धैर्यशील मोहिते-पाटील, वंचित बहुजन आघाडीचे रमेश बारसकर यांच्यात होणार आहे. विशेष म्हणजे २३ अपक्ष उमेदवार या निवडणुकीत नशीब आजमावणार आहेत. त्यामुळे माढ्याची निवडणूक आता बहुरंगी होणार आहे.

माढा लोकसभेसाठी ४२ उमेदवारी ५५ अर्ज दाखल केले होते. छाननीत ३८ उमेदवारांचे ४७ अर्ज वैध ठरले होते. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सहा उमेदवारांनी माघार घेतल्याने ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये शेकापचे सचिन देशमुख, शहाजान शेख, गणेश चौगुले, नागेश हुलगे, मनोज अनपट, रामचंद्र गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. भाजपाचे रणजितसिंह नाईकनिंबाळकर, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट धैर्यशील मोहिते-पाटील, बहुजन समाज पार्टीचे स्वरूपकुमार जानकर, वंचित बहुजन आघाडीचे रमेश बारसकर, भारतीय जवान किसान पार्टीचे गोपाळ जाधव, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे सिध्देश्वर आवारे, रिपाइंचे (ए) चे संतोष बिचुकले, न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे रामचंद्र घुटूकडे, स्वराज्य सेनेचे सत्यवान ओंबासे यांच्यासह अपक्ष अनिल शेंडगे, अमोल करडे, अशोक वाघमोडे, काशिनाथ देवकते, किरण साठे, संदीप खरात, गिरीश शेटे, सचिन जोरे, धनाजी मस्के, नवनाथ मदने, नानासाहेब यादव, नारायण काळेल, नंदू मोरे, बळीराम मोरे, भाऊसाहेब लिंगाडे, रोहित मोरे, रशीद शेख, गणेश सरडे, राहुल सावंत, विनोद सितापुरे, सीताराम रणदिवे, हनुमंत माने, लक्ष्मण हाके असे ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. माढ्यात आता बहुरंगी लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. अपक्षांची संख्या जास्त असल्याने व अपक्षांनी विशिष्ट निवडणूक चिन्हालाच पसंती दिल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना अखेर चिठ्ठ्या काढून चिन्हाचे वाटप करावे लागले. माढा मतदार संघात तीन ईव्हीएम मशीन प्रत्येक बुथवर असणार आहेत; अशी माहिती निवडणूक निरीक्षक मोनिकासिंह यांनी दिली. माढा लोकसभेसाठी येत्या ७ मे रोजी मतदान तर ४ जूनला मतमोजणी होणार आहे.

## दोन उमेदवारांना तुतारी चिन्ह

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना तुतारी वाजविणारा माणूस तर न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे रामचंद्र घुटूकडे या उमेदवारास केवळ तुतारीचे चिन्ह मिळाले आहे. तसेच इतर उमेदवारांना सिंह, भेटवस्तू, शिट्टी, कुकर, ऊस शेतकरी, टेबल, बॅट, टिलर, किटली, ऑटो रिक्षा, अंगठी, भालाफेक, गॅस सिलेंडर, स्पनर, ट्रक, इस्त्री, चालण्याची काठी, हॉकी आणि बॉल, पेनाची निब सात किरणांसह, हातगाडी, रोडरोलर, शिवणयंत्र, कपाट, हिरा, सफरचंद, बॅटरी टॉर्च, ड्रिल मशीन, जातं अशी निवडणूक चिन्ह मिळाली आहेत.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)

आता आपल्या करमाळ्यात !

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरुवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रुग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# नामसाधना प्राथमिक विद्या मंदिरास आयएसओ प्रमाणपत्र प्रदान



करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेला आयएसओ प्रमाणपत्र प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. पहिली ते पाचवी गटातील जिल्ह्यातील फक्त मुलांची सर्वाधिक पटाची शाळा म्हणून या शाळेची ओळख असून या शाळेने क्रिडा नैपुण्य, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आदी उपक्रम राबवून अनेकवेळा न.पा.चा स्वच्छ शाळा-सुंदर शाळा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवला आहे. तसेच शिष्यवृत्ती नवोदय, आयटीएस, एमटीएस, बुध्दीवंत, मंथन अशा विविध स्पर्धा परीक्षेत शाळेने गुणवत्ताधारक विद्यार्थी घडवले आहेत. बालदिंडी, आनंदी बाजार, दीपोत्सव, दहिहंडी, शैक्षणिक सहल, विज्ञान दिन, शंभर टक्के उपस्थिती असे अनेक उपक्रम राबविणारी शाळा आहे. करमाळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्रसमन्वयक दयानंद चौधरी, लिपिक शिवदास कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे शैक्षणिक कामकाज उत्कृष्ट चालू आहे. लोकसहभाग, डिजीटल शाळा, आजपर्यंत अनेक संस्थांचे तालुका, जिल्हा, राज्य पुरस्काराने शाळेला सन्मानित केले आहे. नामसाधना शाळेला मिळालेल्या आयएसओ मानांकनाबद्दल मुख्याधिकारी, प्रशासन अधिकारी आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, सर्व पालक वर्ग, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य यांनी मुख्याध्यापिका सुनंदा माने व शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले.

# वडशिवणे येथे ७० हजाराची चोरी - पहाटेची घटना

करमाळा (सं.प्र.) : घराचा दरवाजा उघडा पाहून दोन अज्ञात चोरट्यांनी घराच्या कपाटातून गंठण व इतर वस्तू असा ७० हजार रूपयांचा ऐवज पळवून नेल्याची घटना वडशिवणे (ता.करमाळा) येथे २३ एप्रिल रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी दत्तात्रय जनार्दन साळुंके (रा.वडशिवणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २२ एप्रिल रोजी माझी पत्नी शारदा व संदीप यांची पत्नी बाहेरगावी गेल्या होता. रात्री साडेदहा वाजता घरी आम्ही जेवण करून स्लॅपवर झोपलो होतो. तसेच संदीप घराच्या बाहेर तर दुसरा मुलगा सचिन व त्याची पत्नी घराचा दरवाजा उघडा ठेवून आतमध्ये झोपले होते. हा दरवाजा उघडा पाहून दोन अज्ञात चोरट्यांनी घरात शिरून ५० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मिनीगंठन, १० हजार रूपये किंमतीचा सॅमसंगचा एलईडी टीव्ही, १० हजार रूपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल असा एकूण ७० हजार रूपयांचा ऐवज दोन अज्ञात चोरट्यांनी पळवून नेला आहे. याप्रकरणी करमाळा पोलीसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.





प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# चिखलठाण येथील श्री कोटलिंग देवस्थानच्या यात्रेनिमित्त येणाऱ्या सर्व भाविक-भक्तांचे...

## हार्दिक स्वागत








**1 May 2024**

स्वागतोत्सुक

**बारकुंड परिवार व समस्त ग्रामस्थ चिखलठाण ता.करमाळा.**



डॉ.भूषण बारकुंड (M.B.B.S)

मा.श्री.राजेंद्र बारकुंड (माजी उपाध्यक्ष, जि.प.सोलापूर)

---

## भावपूर्ण श्रध्दांजली



असा जन्म लाभावा, देहाचा चंदन व्हावा।
गंध संपला तरी, सुगंध दरवळत राहावा ।।

वैद्यकिय क्षेत्रातील दीपस्तंभ व आमचे मार्गदर्शक

**कै.डॉ.एस.टी.शहा**

यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस

**भावपूर्ण श्रध्दांजली !**

शोकाकुल

**करमाळा तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन**
(सर्व पदाधिकारी व सदस्य)

---

## सस्नेह निमंत्रण



।। श्री गजानन प्रसन्न ।। श्री जोतिबा प्रसन्न ।। श्री कमलाभवानी माता प्रसन्न ।।

श्रीमान... स.न.वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेने,

**चि.सौ.कां.धनश्री** (B.Tech.)

स्व.गणपतराव वामनराव काळे-पाटील यांची नात व सौ.आशा व श्री.तात्यासाहेब गणपतराव काळे-पाटील रा.मोरवड, ता.करमाळा यांची ज्येष्ठ सुकन्या

**चि.अमित** (MTech.)

श्री.लक्ष्मण नामदेव साळुंके यांचे नातू व सौ.जयश्री व श्री.उत्तमराव लक्ष्मण साळुंके रा.लासुर्णे, ता.इंदापूर यांचे ज्येष्ठ चिरंजीव

यांचा

**शुभविवाह**

**बुधवार, दि.१ मे २०२४ रोजी दुपारी १२ वा. २३ मि.**

या शुभमुहूर्तावर संपन्न होणार आहे. तरी वधू-वरांस शुभाशिर्वाद देण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !

आपले नम्र

**श्री.प्रकाश वामनराव काळे-पाटील, श्री.तात्यासाहेब गणपतराव काळे-पाटील**
**समस्त काळे-पाटील परिवार, मोरवड**

विवाहस्थळ

**राधेशाम मंगल कार्यालय**
झरे फाटा, करमाळा-जेऊर रोड, ता.करमाळा

टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठविलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे; ही नम्र विनंती !

# १४वे पुण्यस्मरण



कालकथित सौ.कृष्णाबाई रासू कांबळे
(पुण्यस्मरण : दि.२/५/२०२४)

आई.. तुझे असणं आमच्यासाठी सर्व काही होतं
ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं
आता सर्व काही असल्याची जाणीव आहे
परंतू आई.. तू नसल्याची उणीव आहे..!

१४ व्या पुण्यस्मरणदिनी तुझ्या.. स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकूल

**रासू भिकाजी कांबळे व परिवार, रोशेवाडी**

सवाई परिवार(बीड), गायकवाड परिवार(परांडा), लोंढे परिवार(पुणे)
शिलेवंत परिवार(कऱ्हाड), निकाळजे परिवार(औरंगाबाद), बनसोडे परिवार(बीड)

**कृष्णा हॉस्पीटल** राशीनपेठ, करमाळा.(सर्व कर्मचारी)
कार्डिॲक, लॅप्रोस्कोपी, आय.यु.आय ॲन्ड मॅटर्निटी केअर सेंटर

**राहूल स्मृती बचत गट**
करमाळा, जि.सोलापूर

# एस.एस.के.एस. असोसिएटस्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)

**पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टसमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.**

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.



कालकथित सौ.सुनिता कर्मवीर साळवे
(मृत्यू दि.२७/४/२०२१)
(पुण्यस्मरण दि.२७/४/२०२४)

# तृतीय पुण्यस्मरण

कष्टाने संसार थाटला, पण साथ राहिली नाही आम्हाला ।
आठवण तुझी येईल प्रत्येक क्षणाला,
आयुष्यभर वाट पाहीन परत ये जन्माला ।
आता सहवास जरी नसलातरी, स्मृती सुगंध देत राहील ।
जीवनाच्या प्रत्येक पावलागणी, तुझी आठवण येत राहील ।
हमेशा स्वर घुमेल कानी, आठवण तुझी येताच मन येते भरूनी ।

तृतीय पुण्यस्मरणदिनी तुझ्या स्मृतीस..
**विनम्र अभिवादन**


आपले नम्र
**कर्मवीर साळवे व परिवार, करमाळा.**
कांबळे परिवार(येळपणे), सुरवसे परिवार(दौंड), ससाणे परिवार(कल्याण), कदम परिवार (दौंड)



## स्वातंत्र्यसैनिक मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने

# करमाळा येथे मोफत डायलिसीस सेंटरची सुरूवात

करमाळा(सं.प्र.) : स्वातंत्र्यसैनिक मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने अपेक्स किडनी सेंटरच्या माध्यमातून करमाळा येथे मोफत डायलिसीस सेंटरची सुरूवात झाली असून उत्तम पायघन (वय-७१, रा.शेलगाव क) या रूग्णावर पहिली मोफत डायलिसीस प्रक्रिया करण्यात आली. खासदार श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या माध्यमातून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी या डायलिसीस सेंटरची उभारणी केली आहे. या ठिकाणी दहा डायलिसीस मशीन उपलब्ध करण्यात आले असून, राज्य शासनाच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत हे हॉस्पिटल समाविष्ट करून मोफत डायलिसीस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या डायलिसीस सेवेचा फायदा करमाळा, जामखेड, कर्जत, परांडा, माढा या भागातील हजारो रूग्णांना होणार आहे. मोफत डायलिसीस प्रक्रिया करून घेण्यासाठी रूग्णांनी आरोग्य सेवक गणेश मुळे (८६५५७०१५१७) यांच्याशी संपर्क साधावा; असे आवाहन करण्यात आले आहे.





करमाळा तालुक्यातील जनतेच्या सेवेसाठी करमाळ्यात ब्लड बँक सुरू केली असून आता डायलिसीस डायलिसीस सेंटर सुरु केले आहे. भावी काळात एक दर्जेदार हॉस्पिटल उभा करून सर्व रूग्णांना माफक दरात शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. **...महेश चिवटे**
**(स्वातंत्र्यसैनिक मनोहरपंत चिवटे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल)**



करमाळा तालुक्यातील किडनीचे आजार असलेल्या रूग्णांना डायलिसीससाठी नगर, पुणे, सोलापूर येथे जावे लागत होते. करमाळा तालुक्यात जवळपास ७०० रूग्णांना डायलिसीस प्रक्रिया गरजेची आहे; ही बाब आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर खासदार श्रीकांत शिंदे यांनी या प्रकल्पाला मदत करून ही सेवा करमाळा तालुक्यातील रूग्णांसाठी उपलब्ध करून दिली आहे.
**...मंगेश चिवटे (वैद्यकीय मदत कक्षप्रमुख)**

मी शेलगाव (क), ता.करमाळा येथील शेतकरी असून करमाळा शहरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून डायलिसीस सेंटर सुरु झाल्यामुळे मला फार मोठा आधार मिळाला आहे. दर चार दिवसाला मला डायलिसीस प्रक्रिया करावी लागते. मला जीवदान देण्याचे काम मुख्यमंत्री यांनी केले असल्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांचे उपकार मी आयुष्यभर विसरू शकणार नाही. **...उत्तम पायघन**

## लोकसभा निवडणुकीत १०० टक्के मतदान करण्याचा गौंडरे ग्रामस्थांचा निर्धार



करमाळा(सं.प्र.) : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना, तहसील कार्यालय व ग्रामपंचायत गौंडरे यांच्या संयुक्त विद्यमाने गौंडरे गावामध्ये लोकसभा निवडणुकीत १०० टक्के मतदान करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला. गौंडरे गावात रामनवमी पासून हनुमान जयंती पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाच्या सांगता समारंभ प्रसंगी तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरीकाच्या मताचे मोल अनमोल असते. यासाठी सर्व ग्रामस्थांनी शंभर टक्के मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करावा; असे आवाहन केले. यावेळी उपस्थित सर्व ग्रामस्थांनी दोन्ही हात वर करून मतदान करण्याचे अभिवचन दिले. या लोकशाही च्या उत्सवाच्या माध्यमातून संपूर्ण गावात स्वच्छता अभियान, मतदान जनजागृती व्याख्याने यांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे प्रबोधन केले जाणार आहे. तसेच मतदान दिवशी प्रत्येक कुटूंब लोकशाहीची गुढी उभारून लोकशाहीचा आनंदोत्सव साजरा केला जाणार आहे. या ठिकाणचे मतदान केंद्र ही आदर्श मतदान केंद्र निर्माण केले जाणार आहे. यावेळी सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे चेअरमन, पोलीस पाटील, वसुंधरा अभियानचे सर्व कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## जेऊर येथे भगवान महावीर यांची वाजत गाजत पालखी मिरवणूक

करमाळा(सं.प्र.): संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने जेऊर येथे भगवान महावीर जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक काढण्यात आली. पुष्पहार अर्पण करून पालखी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना आदिनाथ माने म्हणाले, की भगवान महावीर यांच्या अहिंसा आणि अपरिग्रह या दोन महान मानवी मुल्यांवर सकल जैन धर्माचे विचार मानव जातीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत. यावेळी शीतपेय व पाणी बॉटलचे वाटप करण्यात आले. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या मिनाक्षी पाटील, सुवर्णा घाडगे, राणी पाटील, प्रियंका खटके, संभाजी ब्रिगेडचे पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके, दादासाहेब थोरात, निलेश पाटील, अतुल निर्मळ, धन्यकुमार गारूडी, पांडूरंग घाडगे, आदिनाथ माने, बाळासाहेब तोरमल, सोमनाथ जाधव, अजित उपाध्ये उपस्थित होते.

## मॅथ्स् जिनियस ऑलंपियाड परीक्षेत

# नामसाधना शाळेचे घवघवीत यश



करमाळा(सं.प्र.) : केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व व्यावसायिक प्रशिक्षण मंडळाकडून सन २०२३-२४ मध्ये नुकत्याच घेण्यात आलेल्या मॅथ्स् जिनियस ऑलंपियाड परीक्षेत करमाळा नगरपरिषदेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे.. **इ.१ ली :** श्रेयश गोडसे (रँक-१), संकल्प जगताप (रँक-२), प्रसन्नजित ढाकणे (रँक-३), आरव लावंड (रँक-४), अविनाश शिवपुजे (रँक-५). **इ.२ री :** शर्विल मस्कर, शिवांश लावंड, विश्वजीत सावंत (रँक-१), मयुरेश ठोंबरे (रँक-२), प्रज्वल कुलकर्णी, विराट नरसाळे (रँक-३), पृथ्वीराज घोलप, श्रीतेज घनवट (रँक-४),मुआज बागवान, कार्तिक मुरूमकर (रँक-५) **इ.३ री :** अवधूत भुसारे, अनन्या शिंदे (रँक-१), गौरव कटारिया, यश शहा (रँक-२), श्रेयश बोबडे, युवराज अडसुळ (रँक-३), सुयश चौधरी, समर्थ जाधव (रँक-४), प्रियांश मोटे, सुयश बोकन (रँक-५). **इ.४ थी :** श्लोक बडे, मयुरेश गर्जे (रँक-१), देवराज कन्हेरे, प्रतिक शेरे (रँक-२), शौर्य गानबोटे, वरद राऊत (रँक-३), ओम नेटके, स्नेहांश खटावकर (रँक-४), वैभव गावित, जय थाटे (रँक-५). **इ.५ वी :** राजवीर सरडे (रँक-१), तेजस कलसे (रँक-२), स्वराज पवार (रँक-३), अथर्व बागल (रँक-४), सुयोग क्षीरसागर (रँक-५). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, मुख्याधिकारी सचिन तपसे, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्रसमन्वयक दयानंद चौधरी, लिपीक शिवदास कोकाटे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, माता-पालक शिक्षक संघाचे सदस्य यांनी केले.

॥ तुमचा विश्वास आमची जबाबदारी ॥
आमच्याकडे
ऐरटिगा गाडी
योग्य दरात
भाड्याने मिळेल

संपर्क
सुनील दौंडे(मेजर)
मो.9723521400
मो.8080760494
पत्ता
आण्णासाहेब जगताप हायस्कुल समोर, बायपास रोड जवळ, सिंचननगर, करमाळा.

श्री गजानन अगरबत्ती
● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !


पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# आंबिल पौर्णिमेच्या उत्सवाने चिखलठाण येथील कोटलिंग यात्रेस प्रारंभ

## १ मे ला छबीना मिरवणुक



करमाळा(सं.प्र.) : चांगभल.. च्या जयघोषात गुलालाची उधळण करत आंबिल पौर्णिमा उत्सवाने चिखलठाण येथील कोटलिंग यात्रेला सुरूवात झाली. भाविकांच्या उपस्थितीत कोटलिंग- जोगेश्वरी विवाह सोहळा होऊन देवाची पालखी मिरवणूक काढण्यात आली. मुख्य यात्रा चैत्र कृष्ण अष्टमीला म्हणजे १ मे रोजी होणार आहे.

सोलापूर, सातारा, धाराशिव, पुणे, नगर या जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या कोटलिंग देवाची यात्रा ही करमाळा तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा समजली जाते. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी कोटलिंग - जोगेश्वरी विवाह सोहळ्याने या यात्रेची सुरूवात होते. मुख्य यात्रा चैत्र कृष्ण अष्टमीला म्हणजे १ मे रोजी छबीना मिरवणूक होणार आहे. सर्वधर्म समभावाचे प्रतिक असणाऱ्या या यात्रेत विविध जाती जमातीच्या समाजातील लोकांना मान असतो. गावातील परीट समाजातील प्रतिनिधींच्या हस्ते देवाला तेल लागते. आंबिल पौर्णिमे दिवशी या देवाच्या मानाच्या कावडी बसल्या जातात. देवाला तेल लागल्याच्या कालावधीत गावातील लोकांकडून तेलवान पाळले जाते. आंबिल पौर्णिमेच्या आरतीनंतर ढोल, लेझीमचा ठेका धरत देवाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. यानंतर आंबिल पिऊन भाविकांनी उपवास सोडले. बारा बलुतेदार संघटनेच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीत सर्व जाती समाजातील लोक सहभागी झाले होते. तेल लागल्यापूसन यात्रा पूर्ण होईपर्यंत ससा-मासा, देव-पारध, देव शिकारीसाठी जाणे हे विधी असतात. या कालावधीत शेतीची मशागतीची कामे करणे, केस कापणे, गादीवर झोपणे बंद असते. चैत्र कृष्ण अष्टमीला छबीना मिरवणूक काढण्यात येते. यामध्ये मुक्त हस्ताने गुलालाची उधळण करत हजारो भाविक सहभागी होतात. या दिवशी मानाच्या कावडी देवाला धार घालतात.

# गंगाराम तालीमच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त अन्नदान



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील मंगळवार पेठेतील गंगाराम तालीम तरूण मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे पवनपुत्र हनुमान जन्मोत्सवानिमित्ताने शहरातील जनतेला अन्नदान करण्यात आले. यास नागरीकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. सध्या मोठ्या प्रमाणात उन्हाळ्याचे प्रमाण असूनही लहानमोठ्या नागरीकांनी गर्दी केली होती व यासाठी तरूण मंडळींनी स्वखर्चाने अन्नदानात भाग घेतला होता व पाण्यापासून सर्व व्यवस्था करण्यात आली होती. यासाठी मंडळातील लहानथोर तरूण कार्यकर्ते मनापासून झटत होते. या ठिकाणी आलेल्या नागरीकांना बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती.




आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक
जिल्हा परिषदेचे माजी सदस्य
हमाल-पंचायतचे माजी अध्यक्ष,
गोरगरीबांचे कैवारी व कामगार नेते
कै.सुभाष(आण्णा) सावंत
७३ व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन
अभिवादक
डी.एस.सिंधी परिवार, करमाळा.


# एकमेकांचे प्रतिस्पर्धी बारकुंड-सरडे लोकसभेसाठी एकत्र

## जेऊर गटातून नाईकनिंबाळकर यांना दहा हजाराचा लीड देणार

करमाळा(सं.प्र.) जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड व आदिनाथ कारखान्याचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत सरडे या दोघांनी मिळून जेऊर गटातून दहा हजाराचे मताधिक्य देण्याची भुमिका चिखलठाण येथील जाहीर सभेत व्यक्त केली.

खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ चिखलठाण येथे आयोजित सभेत श्री.बारकुंड व श्री.सरडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नाईकनिंबाळकर, आमदार संजयमामा शिंदे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, मकाईचे संचालक सरडे, राष्ट्रवादीचे तालुका कार्याध्यक्ष सुजित बागल, रिपाइंचे तालुका अध्यक्ष अर्जुनराव गाडे, रयत शेतकरी संघटनेचे अजय बागल, शिवसेना शहरप्रमुख संजय शिलवंत, प्रियंका गायकवाड, शिवसेना उपजिल्हा प्रमुख ज्योतीताई शिंदे, तालुका प्रमुख राहुल कानगुडे, युवा सेना तालुका प्रमुख नवनाथ गुंड, जेऊर शहरप्रमुख सुरेश कर्चे, महादेव सुर्यवंशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरूवातीला चिखलठाण येथे नाईकनिंबाळकर यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बोलताना चंद्रकांत सरडे म्हणाले, की तत्कालीन खासदार विजयसिंह मोहिते-





पाटील यांनी एसटीचे शेड उभा करण्याशिवाय कुठलीही कामे केली नाही. खासदार शरद पवार यांनी तर माढा लोकसभा मतदारसंघातील लोकांना पाच वर्ष तोंड सुध्दा दाखवले नाही. आता आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात प्रचंड विकासाची कामे होत असून कुगाव ते जेऊर हा रस्ता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन आ.शिंदे व खा.नाईकनिंबाळकर यांनी दिले आहे. उजनीची वीज किमान आठ तास द्यावी ही मागणी प्रलंबित आहे, ती खासदारांनीही मान्य केली आहे.

यावेळी राजेंद्र बारकुंड म्हणाले, की नरेंद्र मोदी पंतप्रधान करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी स्थानिक राजकारण बाजुला ठेवून आम्ही व चंद्रकांत सरडे मिळून सगळे एकत्र येऊन रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना जेऊर गटातून दहा हजाराचे मताधिक्य देऊन आ.शिंदे यांचा विश्वास सार्थ करणार आहे. या सभेला चिखलठाण परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.शिंदे, रश्मी बागल, गणेश चिवटे यांच्यामुळे वाशिंबे येथे विकासकामे

# नाईकनिंबाळकरांना मताधिक्य देण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

करमाळा(सं.प्र.) : आमदार संजयमामा शिंदे, रश्मी बागल, भाजपाचे गणेश चिवटे यांच्यामुळे वाशिंबे येथे विविध विकासकामांसाठी भरघोस निधीची तरतूद करण्यात आली आहे तर अनेक कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यामुळे वाशिंबे गावातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना भरघोस मताधिक्य देण्याचा निर्धार आमदार शिंदे व बागल समर्थकांनी केला आहे.

वाशिंबे गावातील मागील अनेक वर्षापासून रखडलेला वाशिंबे - टापरे चौफुला ते राजुरी रस्ता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण झाला आहे. तसेच वाशिंबे ते पेट्रोलपंप चौक ते राजुरी हा रस्ता रूंदीकरण व डांबरीकरणासाठी ११ कोटीची तरतूद करण्यात आली असून, या कामाचे टेंडरही निघाले आहे. तलाठी कार्यालय इमारत, बापू बोबडे वस्ती ते संजय गायकवाड वस्ती रस्ता, भैरवनाथ मंदिर रस्ता, रामचंद्र पाटील वस्ती रस्ता, अंगणवाडी इमारत, मुस्लीम समाज सभागृह, महादेव मंदिर सभागृह, भैरवनाथ मंदिर सभागृह, पेव्हींग ब्लॉक, आदर्श जि.प.शाळा, जलजीवन योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना आरो प्लांट, सीसीटीव्ही अशी विविध कामे मार्गी लागली आहेत. तसेच भाजपा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या प्रयत्नातून जेऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वाशिंबे येथे स्थलांतरीत करण्यास मंजुरी मिळाली आहे. यासाठी ६ कोटीहून अधिक निधी उपलब्ध होणार आहे. तसेच माजी आमदार शामलताई बागल यांच्या कार्यकाळात वाशिंबेत ३३/११ केव्ही सबस्टेशनला मंजुरी मिळून काम पूर्ण झाले. गणेश चिवटे यांच्या प्रयत्नातून दलित वस्ती सुधारणासाठी पेव्हींग ब्लॉक बसविण्यासाठी ७ लाख, वाशिंबे सोगाव म्हसोबा मंदिर शिव रस्त्यासाठी ३ लाख निधी मंजूर झाला आहे. तसेच टापरे चौक, पद्मावती मंदिर, तात्यासाहेब झोळ वस्ती येथे स्ट्रीट लाईट दिवे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना वाशिंबे गावातून ८० टक्के मतदान करणार असल्याचा निर्धार वाशिंबे ग्रामस्थांनी केला आहे.

# समाजसेवेचा डाव अर्ध्यावरती सोडला



बहुजन विकास संस्थेचे अध्यक्ष व सामाजिक कार्यात कायम अग्रेसर असणारे इसाक पठाण यांचे नुकतेच आकस्मात निधन झाले. वास्तविक पाहता एक-दीड महिना त्यांची तब्येत खालावत चालली. त्यात सुधारणा होईल असे वाटत असतानाच त्यांचे अचानक निधन झाले. पुरोगामी दृष्टीचा हा कार्यकर्ता हिंदु-मुस्लिम बांधवात मन लावून काम करत होता. बेरोजगार आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या अशा दोन्ही घटकांशी पठाण यांचा संपर्क होता. काही संस्थांकडून मदत मिळवून त्यांनी कष्टकरी प्रतिनिधींना दिली आहे. महात्मा फुले समाजसेवा मंडळ, अंधश्रध्दा निर्मुलन समिती, ग्रामसुधार समिती, भटक्या विमुक्त जाती जमाती आदिवासी ज्ञानपीठ, रहेमुना चॅरिटेबल ट्रस्ट, ए.पी.जे.अब्दुल कलाम फौऊंडेशन अशा विविध संस्थांबरोबर त्यांचा समन्वय होता. प्रत्येकाच्या सामाजिक कार्यात ते झोकून देवून काम करत होते. संसारासाठी अर्थार्जनाचा प्रश्न निर्माण होताच अखेर नगरपालिकेकडे त्यांनी काम सुरू केले. नगरपालिकेचे काम आणि सामाजिक काम यांचा ते समन्वय राखत होते. दररोज सकाळी फिरायला जाऊन मित्रांबरोबर गप्पा आणि सामाजिक कार्याचे नियोजन हा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग होता. हिंदुच्या प्रत्येक सणात आणि उत्सवात भाग येणारा हा कार्यकर्ता मुस्लिम धर्मांच्या प्रत्येक उत्सवात तेवढाच सहभागी होता. धर्मनिरपेक्षता काय आहे, असे जीवन जगणारा.. हा कार्यकर्ता आकस्मात गेल्याने समाजाचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालविणे हीच खरी श्रध्दांजली त्यांना ठरेल!

## दहावी-बारावी नंतर पुढे काय ?

# प्रा.रामदास झोळ फाऊंडेशनच्या वतीने ऑनलाइन मार्गदर्शन कार्यशाळा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या संपन्न झाला पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन ही काळाची गरज असून प्रा.रामदास झोळ फाऊंडेशन करमाळा यांचे वतीने विद्यार्थी व पालकांसाठी दहावी- बारावी नंतर पुढे काय ? या विषयी करियर मार्गदर्शन कार्यशाळा ऑनलाइन घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेत तुम्ही घरी बसून सहभागी होऊ शकता. यामध्ये दहावी-बारावी पास झाल्यानंतर पुढे शिक्षणाच्या कुठल्या संधी आहेत, प्रवेश प्रक्रिया कशी असते, सीईटी कोणकोणत्या अभ्यासक्रमाला असते, प्रवेशाचे राऊंड किती व कसे असतात. स्कॉलरशिप कुणाला मिळते, कागदपत्रे कुठली लागतात याबद्दलचे सखोल मार्गदर्शन या कार्यशाळेमध्ये केले जाणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याबद्दलची माहिती खूप कमी प्रमाणात असते. त्यामुळे जगाच्या स्पर्धेमध्ये करमाळा तालुक्याचा विद्यार्थी मागे पडत आहे. या विद्यार्थ्याला योग्य दिशा मार्गदर्शन करून त्याला अपेक्षित असणाऱ्या शाखेमध्ये करियरची योग्य दिशा मिळून योग्य शिक्षण मिळाल्यामुळे चांगल्या ठिकाणी नोकरी मिळू शकते आणि तो आत्मनिर्भर होऊन त्याच्या कुटूंबाचा उत्कर्ष करील या उद्देशाने प्रा.रामदास झोळ फाऊंडेशने ऑनलाइन करियर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना ग्रुपमध्ये समाविष्ट करून झूम मिटींगद्वारे दोनशे ते तीनशे विद्यार्थ्यांना पालकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याबाबत आपले काही प्रश्न असल्यास त्या प्रश्नांची उत्तरेही दिली जाणार आहेत.

करमाळा तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा प्रा.रामदास झोळ फाऊंडेशनचा उपक्रम आहे. त्यामुळे जगाच्या स्पर्धेमध्ये करमाळा तालुक्यातील विद्यार्थी सक्षमपणे उभा राहण्यास पात्र होणार आहे. तरी दहावी बारावीनंतर पुढे काय ? या करियर मार्गदर्शन कार्यशाळेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रा.रामदास झोळ फाऊंडेशन संपर्क कार्यालय बारा बंगले, विकासनगर, करमाळा येथे नांवनोंदणी करून कार्यशाळेत सहभागी व्हावे; असे आवाहन प्रा.रामदास झोळ यांनी केले आहे.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# काँग्रेस आय महिला आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

करमाळा(सं.प्र.): माढा लोकसभा मतदार संघात करमाळा तालुक्याच्या काँग्रेस आय महिला आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक करमाळा तालुका काँग्रेस आय महिला आघाडीच्या अध्यक्षा रजनीताई पाटील यांचे अध्यक्षतेखाली व शहराध्यक्षा अरूंधती जगताप यांचे प्रमुख उपस्थितीत करमाळा येथे संपन्न झाली.

यावेळी रजनीताई पाटील म्हणाल्या, की आमचे मार्गदर्शक व बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप व काँग्रेस आय चे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रहितासाठी तसेच सर्व धर्मांच्या संरक्षणासाठी जातीयवादी सत्ता उलथून टाकून देशात पुन्हा एकदा सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या इंडिया आघाडीची सत्ता येणे गरजेचे आहे. त्यासाठीच माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारासाठी अचूक नियोजन करून जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शाहिनताई शेख, शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करमाळा तालुक्यातील सर्व पंचायत समिती गणामध्ये व करमाळा शहरात हळदी-कुंकवाचे कार्यक्रम आयोजित करून प्रत्येक गावामध्ये पदयात्रा काढून धैर्यशील मोहिते-पाटील यांचा जोमाने प्रचार करणार असल्याचे सांगितले. या बैठकीला करमाळा शहर व ग्रामीण भागातील महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत गुरूकुल पब्लिक स्कुलचे यश

करमाळा(सं.प्र.): राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत गुरूकुल पब्लिक स्कुलने घवघवीत यश संपादन केले असून, परीक्षेत स्कुल मधील ७५ विद्यार्थी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, केंद्रस्तरीय यादीत झळकले आहेत. विद्यार्थ्यांनी यश संपादन करून गुरूकुलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्श करणाऱ्या सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन भोगे यांनी केले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे... रूद्र पडवळे (प्रथम), साईराज सातपुते (प्रथम), श्लोक भोगे (द्वित्तीय). इ.२ री : पृथ्वीराज परदेशी (चौथा), सर्वेश नेटके (सातवा). इ.४ थी : आदित्य भांगे (सहावा), समर्थ शेळके (पाचवा)., गौरव नलावडे (द्वित्तीय, राज्यात पाचवा), तेजस्वीनी जगताप (द्वित्तीय, राज्यात पाचवी), श्वेता कानगुडे (द्वित्तीय, राज्यात पाचवी), स्पंदन पाडुळे (तृतीय, राज्यात सहावी), ज्ञानेश्वरी घुगे (तृतीय, राज्यात सहावी), शौर्य फुके (प्रथम, जि.४ था, रा.७ वा), अवनी परदेशी (प्रथम, जि.४ था, रा. ७ वा), धीरज मस्कर (द्वित्तीय, जि.५ वा, रा.८ वा), दिव्यांका कोळेकर (जि.१ली, रा.८ वी), रूद्रा मस्तुद (जि.१ ली, रा. ८ वी), कार्तिकी पवार (जि.१ ली, रा. ८ वी), प्रणव रंदवे (जि.२ रा, रा.९ वा), चैतन्य जगताप (जि. २ रा, रा.९ वा), निल किरवे (जि.३ रा, रा.१० वा), तेजश्री वाकडे (जि. ४ थी, रा. ११ वी), पार्थ गेंड (जि.५ वा, रा. १२ वा), राजवीर व्हटकर (जि.५ वा, रा.१२ वा)., आदिती भांगे (के.१ ली, जि.६ वी, रा.१३ वी), ज्ञानदा कोल्हे (कें.१ ली, जि.६ वी, रा.१३ वी), शौर्य इंगळे (कें.२ रा, जि.७ वा, रा.१४ वा), अनुष्का सरडे (कें.२ री, जि.७ वी, रा.१४ वी), विहान खाडे (कें.३ रा, जि.१० वा, रा.१७ वा), अर्जुन फरतडे (कें.४ था, जि.११ वा, रा १८ वा), शेहेर शेख (कें ५ वी, जि १३ वी, रा २० वी), अभिषेक हाळनोर (कें. ६ वा, जि.१४ वा, रा.२१ वा), स्वरा सुरवसे (कें.८ वी, जि.१६ वी, रा.२३ वी), श्रीश शिर्के (कें.८ वा, जि.१६ वा), प्रेरणा चांदगुडे (कें.८ वी, जि. १६ वी), स्वरा शिंदे (कें.८ वी, जि.१६ वी), सेहेर शेख (कें.५वा), सान्वी बिडवे (कें.६वी), कृष्णाजी खाटमोडे (कें.७ वा), महावीर शहा(कें.९ वा), जय भंडारे (जि. ६वा), अथर्व मोरे (जि.७ वा), युध्दवीर नलवडे (कें १ ला, जि.८ वा), रूद्रांश वारे (कें २ रा, जि.९ वा), आरोही पाटील (कें.३ री, जि.१०वी), आर्यन गपाट (कें.४ था, जि.११ वा), तेजस्वीनी शिंदे (कें.५ वी, जि.१२ वी), संस्कार फंड (कें.६ वा, जि.१४ वा), आरोही फुके (कें.८ वी, जि.१७ वी), आदित्य दराडे (कें.९ वा), आदर्श भिसे (कें.११ वा), राजवीर घाडगे (कें.१२ वा)., पंशुल सरडे (जि.१ ला, रा.८ वा), आदिती चेंडगे (जि.३ री, रा.१० वी), शौर्य शिंदे (जि.४ था, रा.११ वा), तरेश थोरात (जि.६ वा, रा.१३ वा), ध्रूव मस्तुद (के.१ ला), संस्कृथी विद्वत (कें.२री, जि.९ वी), यशराज सरडे (कें.३ रा, जि.१०वा), आयुष घरबुडे(कें ४ था, जि.११ वा), स्वराली जाधव (कें.५वी, जि.१२ वी), सार्थक सुरवसे (कें.६ वा, जि.१३ वा), धनश्री वाकडे (कें.९ वी, जि.१६ वी), तेजस्वीनी देवकर (कें.१० वी, जि.१७ वी), समृध्दी राखुंडे (कें.१२ वी), प्रणव शिंदे (जि.२ रा, रा.९ वा), स्वरा ओंभासे (कें.१ ली, जि.८ वी, रा.१५ वी), सुप्रिया जगदाळे (कें.३ री, जि.१२ वी), सान्वी नेटके (कें.४ थी, जि.१३ वी), संग्राम रोडे (कें.२ रा, जि.११ वा), समृध्दी जगदाळे (कें. ३री, जि.१२ वी), शौर्य तनपुरे (कें.४ था, जि.१३ वा), संचिता आटुळे (कें.२री, जि.१२ वी, रा.१९ वी)

## कंदर येथे नाईकनिंबाळकर यांचे प्रचारार्थ सभा

# पवार, ठाकरे, सुळे व राऊत हे मराठा आरक्षणाचे शत्रु : महेश चिवटे



करमाळा(सं.प्र.): १९९४ साली मंडल आयोग आल्यानंतर त्यात मराठा समाजाचा समावेश करण्याची जबाबदारी तत्कालीन मुख्यमंत्री म्हणून शरद पवार यांची होती. मात्र त्यांनी जाणीवपूर्वक मराठा समाजाला आरक्षणातून वगळले. १९८३ साली मराठ समाजाचे जननायक आण्णसाहेब पाटील यांनी आरक्षणासाठी देदहना दिल्यानंतर सुध्दा मुख्यमंत्री शरद पवार यांना पाझर फुटला नाही. यामुळे खरे मराठा आरक्षणाचे शत्रु हे शरद पवार आहेत; अशी टिका शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केली.

कंदर येथे भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे प्रचारार्थ आयोजित सभेत श्री.चिवटे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की मराठा समाजाचे लाखोंच्या संख्येने मुकमोर्चे निघत असताना उध्दव ठाकरे यांच्या दैनिकातून मराठा समाज आरक्षण मोर्चाचा मुका मोर्चा असा उल्लेख संजय राऊत यांनी केला होता. दुसऱ्या बाजुने सुप्रिया सुळे यांनी मराठा आरक्षण हा विषय महत्वाचा नसून इतर विषय महत्वाचे आहेत; अशी प्रतिक्रिया दिली. यामुळे मराठा आरक्षणाचे खरे शत्रु पवार, सुळे, ठाकरे व राऊत हेच आहेत. आज नरेंद्र मोदी यांनी आर्थिक मागासले म्हणून दहा टक्के केंद्राचे विशेष आरक्षण मराठा समाजाला दिले आहे. यात सात ते आठ टक्के विद्यार्थी मराठा समाजाचे लाभ घेत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष १० टक्के आरक्षण मराठा समाजाला दिले आहे, हे आरक्षण लागू झाले आहे. याशिवाय वर्षानुवर्षे रखडलेले ५७ लाख मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी म्हणून ओबीसीचे दाखले दिले आहेत. याशिवाय सारथी योजनेमधून मराठा समाजातील गोरगरीब हूशार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कोट्यावधी रूपयांची मदत दरवर्षी दिली जात आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा तरूणांना बिगरव्याजी १५ लाखापर्यंत कर्ज दिले जात आहे. खऱ्या अर्थाने मराठा समाजाला आरक्षण देण्याची भुमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पार पाडली असून उरलेले मराठा समाजाचे प्रश्न सुध्दा मुख्यमंत्री शिंदे हे सोडवणार आहेत. यावेळी भाजपाचे उमेदवार नाईकनिंबाळकर सह आमदार संजयमामा शिंदे, भाजपाचे गणेश चिवटे यांचेसह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धैर्यशील मोहिते-पाटील यांना मुस्लिम संघटनेचा पाठींबा



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना करमाळा तालुका मुस्लिम संघटनेचा पाठींबा देण्यात आला आहे. यावेळी करमाळा तालुका मुस्लिम संघटनेचे अध्यक्ष हाजी उस्मानशेठ तांबोळी, माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी, राष्ट्रवादी युवकचे शहराध्यक्ष अमीर तांबोळी व मुस्लिम संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शरद पवार, विजयसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार नारायण पाटील आदी मान्यवरांसह मुस्लिम बांधव उपस्थित होते. मुस्लिम संघटनेच्या वतीने तांबोळी यांनी शरद पवार यांना पुष्पहार घालून पाठींबा जाहीर केला.

# जहागिरी गेली पण फुगिरी नाही गेली : रणजितसिंह नाईकनिंबाळकर





करमाळा शहरातून भाजपा उमेदवार नाईकनिंबाळकर यांचे प्रचारार्थ पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रा समाप्तीनंतर पत्रकारांशी ते बोलत होते. पुढे बोलताना नाईकनिंबाळकर म्हणाले, मोहिते-पाटील यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व सहकारी संस्था बुडवून स्वत:चे प्रपंच मोठे केले. त्यांना त्यांचे कारखाने विकण्याची वेळ आली. सोलापूर जिल्ह्यात आता त्यांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आले आहे. एकेकाळी त्यांचा असलेला दबदबा संपला आहे. त्या कुटूंबातील दुसऱ्या पिढीच्या अंगात असलेला अहंकारपणा मी जवळून बधितला तुरूंगात जावे लागले असते. शिवाय विधान परिषदेवर रणजितसिंह मोहिते-पाटील यांना घेऊन त्यांना पुन्हा राजकारणात सक्रिय केले. राजकारणात वाळीत पडलेल्या मोहिते-पाटील कुटूंबाला पुन्हा ट्रॅकवर आणण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले. आज मात्र त्यांच्याशी गद्दारी करून ते शरद पवार यांचेकडे गेले आहेत. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर मोहिते-पाटील यांना भाजपाची किंमत कळेल; असाही इशारा नाईकनिंबाळकर यांनी दिला. या पदयात्रे दरम्यान भाजपा उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे ठिकठिकाणी नागरीकांनी स्वागत केले.

## कानगुडे यांचे प्रयत्नाला यश

# देवळालीसाठी पाच टँकर मंजूर

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरालगत असलेल्या देवळाली, खडकेवाडीसह वाड्यांवर प्रचंड पाण्याची टंचाई होती. पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. प्रशासनाने देवळालीसाठी पाच टँकर मंजूर केले आहेत. यासाठी शिवसेना तालुका अध्यक्ष राहुल कानगुडे यांनी उपजिल्हाधिकारी प्रियंका आंबेकर यांना निवेदन देऊन स्वत: पाणी टँकरचे प्रस्ताव कुर्डूवाडी कार्यालयात जाऊन दाखल केले होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी या प्रश्नाचा उपजिल्हाधिकारी आंबेकर यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करून हे टँकर मंजूर करून घेतले. २४ हजार लिटर क्षमतेचे अडीच टँकर व बारा हजार लिटरचे दोन टँकर असे मिळून दररोज ८४ हजार लिटर पाणी देवळाली गावात शासनाच्या वतीने देण्याचे आदेश प्रांताधिकारी यांनी दिले आहे. याबाबत बोलताना कानगुडे म्हणाले, की देवळाली ग्रामपंचायतीने वेळेवर प्रस्ताव दाखल केला नव्हता. मी स्वत: पाठपुरावा करून प्रस्ताव दाखल केला. यामुळे आज टँकर सुरू होत आहेत. ग्रामपंचायतीने गांभीर्याने याची दखल घेऊन पाठपुरावा केला असता तर एक महिन्यापूर्वीच टँकर सुरू झाले असते. सरपंच व ग्रामपंचायत सदस्य आपल्या कर्तव्यात कसूर करत असल्यामुळे देवळाली ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागला; असेही कानगुडे यांनी सांगितले.

**सा.कमलाभवानी संदेश**
**वा.वर्गणी २०० रू.**

**ॲड.अक्षय क. वीर**
बी.ए.एलएल बी.
शिवाजीनगर, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४०४३०००४९

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषत: करमाळा शहर व तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की.. मिळकत डि.सोलापूर सब डि. व ता.करमाळा, शहर करमाळा हद्दीतील सि.स.नं.३९७३/१ ब/८६, क्षेत्रफळ १२३ चौ.मी. पैकी ६१.५ चौ.मी. यासी म्यु.पल घर नं.२६९०/९८ घरजागा. यासी चतु:सिमा पूर्वेस - नगरपरिषद रस्ता, दक्षिणेस - आमचे अशिलांची जागा, पश्चिमेस - सि.स.नं.३९७३/१ब/७५ पैकी सोपान काकडे व पुरूषोत्तम वीर यांची जागा, उत्तरेस - सि.स.नं.३९७३/१ ब/७६ ची जागा. येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णनाची मिळकत आमचे अशिल श्री.जिशान मुझफर मुलाणी यांनी स्वत:चे उत्पन्नातून आमचे अशिलांचे भाऊ आफताब मुझफर मुलाणी व आई श्रीमती आशिया मुझफर मुलाणी यांचे नावे खरेदी केलेली मिळकत आहे. सदरची मिळकत आमचे अशिलांचे भाऊ आफताब मुलाणी व आई आशिया मुलाणी यांचे नावावर असलीतरी सदरची मिळकत आमचे अशिलांनी स्वत:साठी स्वत:च्या उत्पन्नातून खरेदी घेतलेली असल्याने सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे आई व भाऊ यांचा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क व अधिकार कधीही नव्हता व नाही. आमचे अशिलांची आई व भाऊ सदर मिळकतीमध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीररित्या स्वत:चा हक्क व अधिकार सांगू लागल्याने आमचे अशिलांनी वरील नमूद मिळकत आमचे अशिलांची स्वकष्टार्जित मालकीची मिळकत असल्याबाबत जाहीर ठराव होवून मिळणेसाठी व सदर मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी करमाळा येथील मे.कोर्टामध्ये रे.मु.नं.५२०/ २०२३ चा दावा दाखल केलेला असून सदरचा दावा न्यायप्रविष्ठ आहे. अशी वरीलप्रमाणे परिस्थिती असताना आमचे अशिलांचे भाऊ आफताब मुलाणी व आई आशिया मुलाणी वरील वर्णनाची मिळकत अनाधिकाराने व बेकायदेशीररित्या त्रयस्त इसमास विक्री करण्याचे विचारात व प्रयत्नात आहेत. वास्तविक सदरची मिळकत विक्री करणेचा त्यांना कायद्याने मुळीच हक्क व अधिकार नाही. सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांची आई व भाऊ यांचेबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा साठेखत, खरेदीखत अथवा तत्सम स्वरूपाचा हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार करू नये. तरी देखील सदरची मिळकत इतर कोणी खरेदी घेतल्यास अथवा हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास सदरचे खरेदीखत आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर, अधिकारावर बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली. ता.२०/४/२०२४

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**


1 मे
कामगार नेते
आण्णा
क्षणोक्षणी आमच्या मनी
तुमची आहे आठवण
हीच आमच्या जीवनातील
अनमोल आहे साठवण
पुर्नजन्म घ्यावा तुम्ही
हीच आमची..
कमलाभवानी चरणी प्रार्थना !
श्री आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य
हमाल-पंचायतचे माजी अध्यक्ष, गोरगरीबांचे कैवारी व कामगार नेते
कै.सुभाष(आण्णा) सावंत
७३ व्या जयंतीनिमित्त
विनम्र
अभिवादन
अभिवादक
शैलेश मधुकर खडके (B.E.Civil)
'गव्हर्मेंट इंजिनिअर ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर' शिवाजीनगर, करमाळा.


देहरूपाने तुम्ही जरी
आमच्यात नसलातरी
तुमच्या कार्याने निर्माण केलेली
'कर्तृत्वाची ज्योत' आजही
आमच्या मनात तेवत आहे
आशिर्वाद
कै.डी.के.सावंत
आशिर्वाद
कै.अनंता सावंत
हमाल पंचायतचे संस्थापक/माजी अध्यक्ष, आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक
गोरगरीबांचे कैवारी, कामगार नेते व आमचे मंडळाचे मार्गदर्शक
स्व.सुभाष (आण्णा) सावंत
७३ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस
1 मे
विनम्र
अभिवादन
अभिवादक
छत्रपती शिवाजी तरूण मंडळ
सावंतगल्ली, करमाळा., जि.सोलापूर